Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.I/ Feb; 12pp.1-4 डॉ. विजय रेवजे ISSN:-2230-7850

Research Papers

# स्त्री मनातले जाते

डॉ. विजय रेवजे
रयत शिक्षण संस्थेचे
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील
महिला महाविद्यालय
सोलापूर .

## प्रस्तावना :—

मराठी लोकसाहित्यातील ओवीगीताचा आणि जात्याचा ऋणानुबंध जवळचा आहे . धान्याचे पीठ करण्याचे एक साधन म्हणून जात्याला महत्त्वं आहे . दोन वर्तुळाकार चपटया दगडानी जाते बनविले जाते . या दोन भागांना 'पाळया' असे म्हणतात . खालची पाळी स्थिर असून वरच्या पाळीला मध्यभागी एक मोठे छिद्र पाडून वरची पाळी खालच्या पाळीच्या वर फिरत राहील अशा पध्दतीने बसवलेली असते . वरच्या पाळीच्या मध्यभागी असार्णाया छिंद्रातून धान्य टाकले की ते खालच्या पाळीच्या पृष्ठभागावर येवून त्यातून पीठ बाहेर पडते .

'जाते' या शब्दांच्या उत्पत्तीविषयी भारतीय संस्कृति कोशकार म्हणतात .1 "जाते हा शब्द यंत्रकम् या यंत्रवाचक शब्दांपासून बनलेला आहे . यंत्रकम् यंत्तम् जंतम् जत् जाते अशा प्रकियेने मराठीत आलेला आहे .

मराठीत जाते घरोटा कानडीत बिसूकल्ला गुजराथीत घट्ट तेलुगूमध्ये ईसरूराऊतू सिंधी भाषेत जंट्र तिबेट मध्ये रांधा हिंदीत जंदर पंजाबीत जंद्रुव नेपाळीत जातो बंगाली भाषेत जाता असामियामध्ये झार इंग्रजीमध्ये ग्रदिन्गि मल्लि रोमनीसीरियन भाषेत जंद्रा चीनी भाषेत श्रुती इ.नावानी जात्याला ओळखतात. भारतीय समाजजीवनात प्रत्येक घरात जाते असते. प्रत्येक घरातील लग्न प्रसंगी नव्याची पौर्णिमा दसरा दिवाळी इ.प्रसंगी जात्याची मनोभावे पूजा करतात.

जात्याचा वापर इ.स.पूर्व दोनहजार वर्षा पासून भारतात होत होता. सिंधू संस्कृतीसी समकालीन असर्णाया लोथलमधील उत्खननात जात्याची वरची पाळी गोव्यातील तडकोड महाराष्ट्रातील नेवासे तेर वडगाव सिरपूर येथील व नागार्जुनकोंडा आणि तक्षशिला येथील उत्खननात जाती सापडली आहे. भारतीय कुंटुबजीवनात जात्याचा वेळोवेळी उपयोग केला जात होता. स्वातंज्यप्राप्तीपर्यंत प्रत्येक कुंटूबात पहाटेच्या वेळी जात्याची घर्ररघर्रर ऐकू येत होती. दळर्णाया स्त्रीच्या मुखातून स्त्रवर्णाया अमृतमधूर ओव्याही ऐकायल मिळत. गाण्याने श्रम हलके होतात म्हणून जात्यावर दळण दळताना स्त्रिया ओव्या गात. आपल्या जीवनातील सुख दुःख व्यथावेदना आनंद आणि नानाविध अशा भावभावनांना त्या जात्याजवळ मोकळी वाट करून देत आपले सारे हद्गत त्या जात्याजवळ सांगत असत. रामप्रहरीच्या प्रसंगी दळण दळताना जात्यात धान्याचे पीठ त्या करीत ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्या वस्तुस्थितीत देखील दिव्यानुभूती घेर्णाया संतवाणीचा संस्कार असर्णाया या मायमाऊली त्या जात्याशी एकरूप होत आणि आपल्या भावनांची अभिव्यक्ती करीत म्हणून मधुकर केचे म्हणतात 2

"जेव्हा संताच्या वाणीचा वेदनांचा वेद झाला
तेव्हा जात्यातला जीव पीठ होऊन हासला.

दळण दळर्णाया स्त्रीच्या मुखातून अमृतमधूर ओव्याचा जन्म होतो. गाण्याने श्रम हलके होतात म्हणून जात्यावर दळण दळताना ओव्या गायल्या जातात. यावेळी स्त्रीह्यदयात अनेक भावभावनांचे कल्लोळ व्यक्त होतात. एखादी जबाबदारी स्वीकारली की ती पार पाडण्याची क्षमता आपोआपच येते. हा भाव व्यक्त करण्यासाठी 'जात्यावर बसल्यावर ओवी सूचते' अशी एक म्हण मराठीत प्रचलित आहे. जात्याचा आणि स्त्रीचा हा श्रणानुबंध वर्णन करतांना बहिणाबाई

Please cite this Article as : डॉ. विजय रेवजे. , स्त्री मनातले जाते : Indian Streams Research Journal (Feb ; 2012)

म्हणतात.3'अरे घरोटा घरोटा तुझ्यातून पडे पिठी

तसं माझं गाणं पोटातून येतं ओठी
अरे घरोटा घरोटा माझे दुखता रे हात
तसं संसाराचं गानं माझं बसते मी गात'

जात्याचा आणि स्त्रीचा ऋणानुबंध जवळचा असल्यामुळे स्त्रीने त्याच्याठायी देव पाहिला त्याला देवत्वं बहाल केले. कारण या जगतातील चराचरात ई श्वर भरून उरला आहे. किंबहुना प्रत्येक कामाच्या प्रारंभी त्या कामात हात जोडून सुरूवात करण्याची परंपरा आपल्या भारतीय संस्कृतीत आहे म्हणून एक स्त्री म्हणते 4

'जात्या तू ईसस्वरा नको मला जड जाऊ
बयाच्या दुधाचा सया पाहतात अनुभावू
जात्याला नमस्कार करावा वाकूनी
सासर माहेर चुडया आयुक्ष चिंतूनी'

जात्यावर बसल्यावर स्त्रीला ओवी कशी सूचते हे सांगणे तसे अवघड आहे पण अनेक वेळा ती आपोआप सूचते. मानसशास्त्रीय विचारानुसार स्त्रीची ती अभिव्यक्ती असते सादरीकरणाची धडपड असते त्यासाठी तिला अट्टहास करावा लागत नाही. तर जाते ओढताना अंतकरणात उमाळे दाटून येतात. सुखदुःखाना कंठ फुटतो व ओवीचा जन्म होतो. जात्यातून पीठ जसं बाहेर पडतं अगदी तसंच सहजपणे गाणं ओवी बनून येतं. या ओवीत ती जात्याला नमस्कार करते त्याप्रमाणेच ओवी गातगातच दळण दळावे लागते म्हणून ती म्हणते 5

'जात्याला वैरणं घालते एका शेजं
प्रितीच्या पांडुरंगा आधी नाव घेते तुझं
मुक्या दळणाचा नैवेध्य नाही चालत ग देवा
पंढरीच्या पांडुरंग सखा सोयरा आधी गावा'

अशा प्रकारे पंढरीच्या पांडुरंगाचा आठवती करते. जात्यावर दळण दळणारी स्त्री भावसंपन्न सत्वंगुणी आहे कारण तिने प्रारंभी जात्यात आणि युगायुगाने कर कटावरी ठेवूनिया भक्तासाठी उभे असर्णाया भूवैकुंठीच्या पांडुरंगाला जात्याबरोबर वंदन केले आहे. तिचा देव मोठा आहे. तिची ध्येये आणि स्वप्ने मोठी आहेत तिचे काम मोठे आहे. तिच्या मनामधील आशावाद मोठा आहे म्हणून ती म्हणते 6

जात मी वठीते जसं हरण पळतं
मायबाई तुहं दूध मनगटी खेळंत
'जातं मी वढीते जसं बाह्या बळ माझं
पेले बाळपनी मायबाई तुझं दूध
जात्या रे ईसस्वरा नग मला जड जावू
मायबाईच्या दूधाला शेजी ठेवतील नावू
जात्या रे ईसस्वरा तुला वढून पाहिलं
मायबाईचं हे दूध तुह्या कारनी लवीलं
जात्याची भिंगोरी घागरीचा केला चेंडू
मायबाईच्या दूधाची कुंठ कुंठ पैनं मांडू'

स्त्रीमनातले जात्यासंबंधी असे निविध भाववंध ती वेळोवेळी वर्णन करते त्याबरोबर आपले वडील विविध स्थान देवता बहीण भाऊ नणंद भावजय शेती निसर्ग मैत्रिणी प्रियकर पती अनेक संर्ततीर्थक्षेत्रे रामसीता विठ्ठल रूक्मिणी स्वातंज्योत्तर कालखंडात गावोगावी आलेल्या पिठाच्या गिरण्या रेल्वे महापुरूषांच्या कामर्गीया इ.नानाविध भावनांना तिने जात्यावर दळताना शब्दरूप दिले आहे.

स्वातंज्योत्तर कालखंडात भारतीय समाज जीवनात प्रचंड वेगाने भौतिक प्रगती होताना दिसत आहे. माणसाच्या मोठेपणाचे मूल्यमापन करताना त्याची माडी आणि माडीसमोरील परदेशी बनावटीच्या गाडया यावर केले जात आहे. भौतिक सुखसमृध्दी आणि चंगळवादी जीवनशैलीच्या पाठीमागे माणूस पळताना दिसतो आहे. स्वावलंबन श्रमावलंबन स्वाभिमान चारिज्य मानवतामूल्यांची जपणूक यापासून दूर जाताना दिसतो आहे. कृषी संस्कृतीशी त्याची नाळ तुटती आहे. शहरी जीवनाप्रमाणेच ग्रामीण परिसरात पिठाच्या गिरण्या गावोगावी आणि घराघरात सुध्दा आल्या आहेत. स्त्रीयांचे कष्ट कमी झाले आहेत. स्त्रीयांच्या जीवनात झालेल्या बदलाबाबत पाडे ता.वाई जि सातारा येथील श्रीमती रोशनबी मेहमूद शॉ सय्यद वय 70 या म्हणाल्या "गावोगावी घरोघरी गिरण्या झाल्या स्त्रीयांचे कष्ट कमी झाले आणि आजार वाढले आहेत." याप्रमाणेच श्रीशैल नगर सोलापूर येथील श्रीमती.कमलाबाई महादेव खानापूरे वय वर्षे 65 या जात्याविषयीच्या आपल्या भावना व्यक्त करतांना म्हणाल्या की "जात्यावर ओव्या गात दळलेल्या पिठाच्या भाकरी गोड आणि रूचकर लागायच्या पण गिरणीतल्या पिठाच्या भाकरी निव्वळ सप्पक लागतात पोट भरत नाही." तर मु.पो.एकुरखे ता.मोहोळ जि.सोलापूर येथील सौ.काशीबाई प्रभाकर ढवण वय वर्षे 75 या जात्याविषयीच्या आपल्या आठवणी सांगताना म्हणाल्या की "जात्यावर दळण दळर्णाया बाईला आपण जीवाभावांच्या माणसांशी बोलत आहोत असे वाटायचे अलीकडे पिठाच्या गिरण्या आल्या आणि बाईचं मनं मुकं झालं आज केवळ पूजेपूरते जाते उरले आहे घरातील मोकळया जात्याला पाहून अनेक आठवणी जाग्या होतात."

अशा प्रकारे जात्याशी नाते असर्णाया पण जात्यापासून नाळ तुटलेल्या या स्त्रीयांनी आपल्या मनातील जात्याविषयीची ममत्त्वं वरील शब्दांत वर्णन केले आहे.

संत साहित्य आणि जाते ः मराठी संत साहित्यात ही जात्याविषयीचा जिव्हाळा अनेक संतानी आपल्या रूपकात्मक रचनेतून वर्णन करून ठेवला आहे यामध्ये संत जनाबाई संत एकनाथ आणि रामदास पंचायतनातील एक संत केशवस्वामी भागानगरकर इ.यांनी जात्यावर आध्यात्मिक रूपके रचलेली आहेत. मराठी संत साहित्याप्रमाणेच आधुनिक मराठी साहित्यात बहिणाबाई चौधरी डॉ.सरोजिनी बाबर डॉ.तारा भवाळकर डॉ. कुन्ता जगदाळे डॉ.भगवंत देशमुख चंद्रकांत गावस डॉ.दत्ता भोसले इ.अनेकांनी जात्यावरील ओव्याचे संपादन आणि जात्याविषयीचे लेखन केले आहे.

वैशिष्टये

1. स्त्रीमनात जात्याविषयी अपार श्रध्दा आहे.

2. जात्याला स्त्रीयांनी ईश्वरच मानले आहे.

3. जात्याशी स्त्रीमनाचे भावनिक बंध आहेत.

4. जात्याला स्त्रीयांनी आपल्या सुखदुःखाचा साक्षीदारा मानले आहे.

5. आधुनिक काळातील स्त्रीयांचा जात्यांशी असणारा संपर्क केवळ पूजेपुरता आहे.

संदर्भ

1. जोशी महादेव शास्त्री - 'भारतीय संस्कृति कोश' खंड 3 रा पृष्ठ.क्र.590.

2. बाबर सरोजिनी ह्यसंपाह - 'लोकसाहित्य व लोकसंस्कृती' महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य
समिती प्रथमावृत्ती.1961. पृष्ठ क्र.110.

3. चौधरी बहिणाबाई - 'बहिणाबाईची गाणी' सुचित्रा प्रकाशन मुंबई प्रथमावृत्ती 2004 पृष्ठ क्र.16.

4. डॉ.जगदाळे कुन्ता - 'मराठी मुस्लिम ओव्या' प्रकाशक श्री.नारायण जगदाळे शिवाजी नगर बार्शी प्रथमावृत्ती 2004 पृष्ठ क्र.70.

5. ऊनि - पृष्ठ क्र.275.

6. डॉ.देशमुख भगवंत - दगडी जात्याचा रेशमी गळा' प्रतिमा प्रकाशन 1362 सदाशिव पेठ 411030 प्रथमावृत्ती 2000 पृ.क्र. 56.

या लेखासाठी

1. श्रीमती रोशन श्री.मेहमूद शॉ सय्यद.

2. श्रीमती कमलाबाई खानापूरे

3. सौ.काशीबाई ढवण इ.चे सहकार्य लाभले.

**Please cite this Article as :** डॉ.विजय रेवजे. , स्त्री मनातले जाते : **Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**